मुखपृष्ठ कथा

मुंबईचे मुसलमान आणि त्यांचे ‘मित्र’

ज्योती पुनवणी

आसाम आणि म्यानमार (पूर्वाश्रमीचा ब्रह्मदेश) मधील मुस्लिमांच्या हत्यांच्या निषेधार्थ मुंबईत आयोजित करण्यात आलेली सभा आणि यावेळी पोलीसांच्या गोळीबारामध्ये झालेली दोन मुस्लिमांची हत्या ही अनेक अर्थाने ऐतिहासिक बाब म्हणावी लागेल. एक, मुंबई पोलीसांची वर्तणूक, ज्या वर्तणुकीवर एक नव्हे तर दोन न्यायिक आयोगांनी मुस्लिमांप्रती जमातवादी व्यवहार करत असल्याचा ठपका ठेवलेला होता आणि दोन, ही सभा आयोजित करणाऱ्यांबद्दल मुंबईतील मुस्लिमांमध्ये रोष असणं, या दोन्हीही गोष्टी अभूतपूर्व अशा आहेत.

शांततेची दलाली

१९९२-९३ च्या दंगलीमध्ये पोलीसांच्या गोळीबारामध्ये २३३ मुस्लिम आणि १११ हिंदू मारले गेले (दोनास एक). दंगलखोर जमावांनी केलेल्या हिंसाचारामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या मुस्लिमांचे प्रमाण याहूनदेखील अधिक होते (३२८ मुस्लिम आणि १०८ हिंदू, म्हणजे तीनास एक). तेव्हापासून मुंबईतील मुस्लिमांनी शक्यतो रस्त्यावर उतरून निषेध करणे टाळले होते. रस्त्यावर आंदोलन करणारा मुस्लिमांचा जमाव हा बेफाम उधळलेल्या बैलासारखा असतो आणि त्यामुळे गोळीबाराशिवाय तो आवाक्यात येत नाही असा मुंबई पोलीसांचा ठाम समज असल्याचे ते जाणून चुकले होते. अर्थात आपल्यातल्या सरफिऱ्यांवर नियंत्रण ठेवणे ही गोष्ट अवघड असल्याची देखील त्यांनी ओळखले होते. १९९५ मध्ये सेना-भाजप युतीचं सरकार आल्यावर तर त्यांचा हा निर्णय अधिकच पक्का झाला. साहजिकच समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी मग त्यांनी काही वेगळे मार्ग शोधून काढले. पत्रकार परिषदा घेणे (इंग्रजी प्रसारमाध्यमं बव्हंशी इथे येणं टाळत असत) आणि मंत्र्यांकडे शिष्टमंडळ घेऊन भेटायला जाणे हे दोन मार्ग प्रायतः हाताळले. पैकी दुसऱ्या मार्गातून गेल्या काही वर्षांत लोकांमध्ये फारसा आधार नसलेल्या काही व्यक्ती समाजाच्या नेत्या म्हणून

ईमेल : jyoti.punwani@gmail.com

मान्यता मिळवू शकल्या आहेत. समाज आणि सरकार यांच्यामधले मध्यस्थ अशा आविर्भावातच त्या वावरत असतात.

१९९९ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार आल्यानंतर आणि महाराष्ट्र मंत्रिमंडळात पहिल्यांदाच पाच मुस्लिमांचा समावेश झाल्यामुळे मुस्लिम समाजाला थोडी हिंमत आल्यासारखे झाले. पण याही वेळी केवळ दोनच गटांनी रस्त्यावर न उतरण्याची पद्धत मोडली होती. अर्थात हे दोन्हीही गट शांततामय मार्गांचा वापर करण्यासाठी कधी ख्यातनाम नव्हतेच म्हणा. त्यातला पहिला गट म्हणजे बंदी घालण्यापूर्वीची सिमी (स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया) आणि दुसरा अबु असीम आझमींचा समाजवादी पक्ष. अबु आझमी व्यक्तिशः सिमीशी दीर्घ काळ घसट ठेवून होते, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. अबू आझमी सत्ताधारी आघाडीत सहभागी असण्यातून सिमीने रस्त्यावर उतरण्याची, आझमींचा बालेकिल्ला असलेल्या कुर्ल्यामध्ये, हिंमत केली. दिल्लीमध्ये बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी कुराण जाळण्याचा प्रकार केल्यानंतर (मार्च २००१) सिमीने कुर्ल्यामध्ये बसेसवर दगडफेक केली होती. पोलिसांनी त्यावेळी गोळीबार केला नाही. मुस्लिम समाजातील नेतृत्वानं हे आंदोलन चिघळणार नाही यासाठी ताबडतोबीनं पुढाकार घेतल्यानं मुंबईत इतरत्र कुठेही काहीही घडलं देखील नाही. पण, त्यानंतर लगेचच पोलीसांनी सिमी कार्यकर्त्यांच्या केलेली धरपकड ते रोखू शकले नाहीत. सहा महिन्यातच सिमीवर बंदी घालण्यात आली.

राहता राहिला प्रश्न आझमींचा, तर त्यांच्या पक्षाच्या सभांना, मोर्च्यांना आणि धरण्यांना मानखुर्द, कुर्ला, आणि वांद्रे या त्यांचा प्रभाव असलेल्या भागांचा अपवाद करता कुठेही मोठा पाठिंबा मिळाला नाही, मिळत नाही. त्यांचे बहुतेक कार्यक्रम हे अगदीच किरकोळ असतात.

पण २००४ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार पुन्हा सत्तेत आले आणि सरकारच्या मुस्लिमांबरोबरच्या संबंधांमध्ये थोडा बारीकसा पण निश्चित असा बदल झाल्याचे जाणवते. भाजप-सेनेने मुस्लिमांना कायमच शत्रूस्थानी मानल्याने त्यांच्याबरोबर जोडून घेण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. तर दुसऱ्या बाजूला काँग्रेसने कायमच आपण मुस्लिमांचे मित्र असल्याची शेखी मिरवली आहे. पण त्यासाठी प्रत्यक्ष समाजाशी जोडून घेत काम करण्याची गरज काँग्रेसला कधीही वाटलेली नाही. समाजातील काही बड्या व्यक्तींच्या मार्फत मौलवी-उलेमा आणि मालदार व्यापाऱ्यांना आपलेसे करण्याची जुनीच नीती काँग्रेसने याही वेळी अनुसरली.

याचं एक मासलेवाईक उदाहरण म्हणजे आरिफ नसिम खान या काँग्रेसच्या मंत्रिमहोदयांचं देता येईल. खान हे काँग्रेसचे एक आम सभासद होते. श्रीकृष्ण आयोगाची अंमलबजावणी करावी यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर केली आणि ते प्रकाशझोतात आले. झालं, त्यांच्या या एका कामगिरीमुळे काँग्रेसने त्यांना मंत्रिपद देऊ केलं. मंत्री झाल्यापासून खान यांनी श्रीकृष्ण अहवालाच्या अंमलबजावणीचं काम कायमसाठी सोडून दिलं. आता त्यांचा बहुतेक वेळ हा शहरातील उलेमांना-मौलवींना आणि ऊर्दू प्रसारमाध्यमांना खूष ठेवण्यात जातो. आपणच समाजाचे खरे नेते आहोत असे पक्षनेतृत्वाला वाटावे हाच त्यांचा उद्देश. अर्थात त्यांच्या या प्रयत्नांना यशही मिळत असलेले दिसते. १९९९ पासून आजपर्यंत मुख्यमंत्री कोणीही असो, नसिम खान आपलं मंत्रिपद टिकवून ठेवू शकलेले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचा व्यवहार यापेक्षा वेगळा नाही. १९९९ आणि २००४ या दोन्हीही निवडणुकातील विजयानंतर राष्ट्रवादीला महत्त्वपूर्ण खाती मिळाली. १९९९ मध्ये छगन भुजबळ गृहमंत्री झाले. श्रीकृष्ण आयोगाच्या शिफारसी सादर होऊन तोवर केवळ एक वर्ष झालं होतं. पोलीस खात्यावर नियंत्रण असलेल्या भुजबळांचं श्रीकृष्ण आयोगाची अंमलबजावणी करणं हे प्राथमिक कर्तव्य होतं. (विशेषतः दंगलीसाठी दोषी असलेल्या पोलिसांवर कारवाई करणे आणि पोलिसांनी फाईलबंद केलेली दंगलीची प्रकरणे पुन्हा तपासासाठी खुली करणं ही दोन पावलं) यातून पोलिसांबरोबरच दंगलीस जबाबदार असलेल्या शिवसेनेला एक योग्य असा धडा मिळाला असता. भुजबळ हे पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असल्यामुळे म्हणा पण त्यांना दंगलीतील पोलिसांचं वर्तन खटकल्यासारखं वाटलंच नाही. त्यामुळे त्यांना शिक्षा करणं तर दूरच उलट भुजबळांनी गृहमंत्रीपदाचा वापर पोलिसांना पाठीशी घालण्यासाठीच केला.

साहजिकच मुस्लिमांमध्ये भुजबळांबद्दल मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली. त्याचं आणखी एक कारण होतं. भुजबळ हे सेनेतून बाहेर पडलेले पहिले नेते होते. त्यामुळे ते ठाकरेंचे कट्टर दुश्मन मानले जात होते. त्यांच्याकडून सेनेतील गुंडगिरीला आळा बसेल अशी मुस्लिम समाजाची अपेक्षा होती. भुजबळांच्या जैसे थे धोरणामुळे मोठी निराशा पसरली. अर्थात समाजातील काही प्रतिष्ठितांनी तरीही भुजबळांबरोबर मैत्री

टिकवून ठेवलीच आणि त्या बदल्यात समाजाचे प्रवक्ते म्हणून आपलं स्थान अढळ करून घेतलं. भुजबळांसंच धोरण पुढे आर.आर. पाटलांनी अनुसरलं.

मूलतत्त्ववाद्यांचा चमू

आघाडी सरकारच्या या धोरणाचा सर्वाधिक फायदा रझा अकादमीला झाला. लोकांमध्ये पसरलेल्या नाराजीला अकादमीने आपल्या आक्रमक कारवायांनी अधिकाधिक आपलंसं करून घेत आपणच समाजाचं प्रतिनिधित्व करतो हा दावा अकादमीनं केला. देवबंदींविरुद्धची हिंसक आंदोलनं असोत, तस्लिमा नसरीन यांना भारतीय नागरिकत्वाच्या विरोधात केलेली आगखाऊ भाषणं असोत आणि अगदी अलीकडे जयपूर सांस्कृतिक महोत्सवात सलमान रश्दी आल्यास त्यांच्यावर चप्पल फेकणाऱ्यास अकादमीनं जाहीर केलेलं एक लाख रुपयांचं बक्षीस असो, अकादमी कायमच प्रसिद्धीच्या झोतात राहिली. अर्थात टीआरपीसाठी आसुसलेल्या प्रसारमाध्यमांकरता अशा गोष्टी म्हणजे दारूगोळाच ठरला. साहजिकच अकादमी अधिकाधिक वैधपणे उपक्रम राबवत राहिली.

ही सारी पार्श्वभूमी लक्षात घेता अकादमीनं आसाममधील हिंसाचाराच्या निषेधार्थ आयोजित केलेल्या सभेला परवानगी नाकारणे योग्य ठरले असते, किंवा ते शक्य नव्हते तर कठोरातल्या कठोर अटींवर (श्रीकृष्ण आयोगानेच घालून दिलेल्या अटी या एक चांगलं प्रारूप होत्या) परवानगी द्यायला हवी होती. अकादमीचा पोलीसांच्या संदर्भातला इतिहास अधिकच काळाकुट्ट आहे. २००६ मध्ये भिवंडीमध्ये मुस्लिमांसाठीच्या कथित दफनभूमीमध्ये पोलीस स्टेशनाची इमारत उभी करायला अकादमीने विरोध केला आणि जेव्हा पोलिसांनी या विरोधाला न जुमानता पोलीस स्टेशन उभे केले तेव्हा मुस्लिमांच्या दंगलखोर जमावाने पोलीस स्टेशनवर हल्ला करून दोन पोलिसांना ठार मारले होते. त्यावेळी प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन मुस्लिम मारले गेले. एवढं होऊनही अकादमीचा प्रमुख असलेल्या सईद नुरीला गजाआड करणं तर दूरच काँग्रेसचे आमदार असलेल्या बाबा सिद्दीकींनी आपल्या पंखाखाली घेतलं. १९९२-९३ मध्ये आख्खी मुंबई जळत असताना भिवंडीमध्ये ज्या मोहल्ला समित्यांमुळे काहीही घडलेलं नव्हतं, त्या समित्यांना सडवण्याचं काम काँग्रेसच्या दोन्ही गृहमंत्र्यांनी केलं आणि मग साहजिकच रझा अकादमी भिवंडीतील मुस्लिमांची एकमेव प्रवक्ती म्हणून पुढे आली.

भिवंडी गोळीबारानंतर गृहमंत्री आर.आर.पाटलांनी जाहीर वक्तव्य केलं की, पोलिसांवर कुणी दगडफेक केली तर त्याला पोलीस गोळीबाराने प्रत्युत्तर देतील! आबांची ही घोषणा धक्कादायक आणि दुर्दैवी असली तरी मुंबई पोलिसांचं वर्तन कसं असतं हे नेमकेपणाने सांगणारीदेखील होती. मुंबई पोलिसांमध्ये सेनाधार्जिण्यांची मोठी संख्या असूनसुद्धा ९२-९३ च्या दंगलीत जेव्हा शिवसैनिकांनी पोलीसांवर हल्ले केले तेव्हा पोलिसांनी सैनिकांवरदेखील गोळीबार केला होता आणि अनेक शिवसैनिकांना मृत्यू पत्करावा लागला होता.

सुजाण प्रतिसाद

मुंबई पोलीसांची ही पद्धत आणि त्यातच मुस्लिमांबद्दल पोलिसांना वाटणारी शत्रुत्वाची (कागदोपत्री नोंदली गेलेली) भावना पाहता ११ ऑगस्ट रोजीच्या सभेतील मुंबई पोलीसांचा प्रतिसाद हा ऐतिहासिकच ठरतो. आझाद मैदानाबाहेर मुस्लिम तरुणांचा एक जमाव काहीही कारण नसताना पोलीसांवर हल्ला करत होता. एवढेच नव्हे तर महिला पोलीसांचा विनयभंग करत होता, पोलीस आणि प्रसारमाध्यमांची वाहने पेटवून देत होता. एकूण जखमी झालेल्या ६३ पैकी ५८ जण पोलीस होते. त्यावेळी आझाद मैदानात २०,००० मुस्लिम सभेसाठी जमा झालेले होते. अनेकांच्या हातात प्रक्षोभक घोषणा असलेले फलक होते. व्यासपीठावरून भडकावू स्वरूपाची भाषणे अनेक मौलाना करत होते. एकूणात पोलीस आणि जमा झालेल्या मुस्लिमांमध्ये एक अभूतपूर्व असा भयानक हिंसाचार घडण्याच्या सर्व शक्यता दिसत होत्या.

आणि तरीही ही स्फोटक परिस्थिती हाताबाहेर गेली नाही याचे संपूर्ण श्रेय पोलीस आयुक्त अरुप पटनाईक यांच्या व्यक्तिगत कामगिरीचे आहे. त्यांनी स्वत: आझाद मैदानावरील सभेच्या मंचावर जाऊन १९९२ ची पुनरावृत्ती होऊ देऊ नका असे आवाहन करत जमलेल्या लोकांना शांतपणे आपापल्या घरी परतण्यास सांगितले. मी माझ्या लोकांवर नियंत्रण ठेवतो असे त्यांनी सभेला निक्षून सांगितले. कदाचित पहिल्यांदाच रस्त्यावर उतरलेल्या मुस्लिमांना आवर घालण्यासाठी पोलीसांनी अश्रुधुराचा वापर केला. (गोळीबार हा जणू नियमच होय.)

श्रीकृष्ण अहवालाने १९९२ च्या दंगलीला कारणीभूत ठरलेल्या गोष्टींची चर्चा करताना मुंबई पोलीसांचा असंवेदनशील आणि कठोर व्यवहार हे एक महत्त्वाचे कारण सांगितले होते. तत्कालीन पोलीस आयुक्त एस.के.बापट यांनी बाबरी मशिदीच्या पतनाच्या निषेधार्थ रस्त्यावर एकही आंदोलन होणार नाही हे

पाहण्याची जबाबदारी पोलीसांवर टाकली होती. त्यामुळे ६ व ७ डिसेंबर १९९२ रोजी जे मुस्लिम शांततापूर्ण मार्गाने रस्ते अडवत होते, धरणी धरत होते, घोषणा देत होते त्यांच्यावर पोलीसांनी बेछूट गोळीबार केला. त्यावेळेला जर अरुप पटनाईक पोलीस आयुक्त असते तर मुंबईत पुढच्या दोनतीन महिन्यात जे काही घडले ते कदाचित घडले नसते.

११ ऑगस्टच्या घटनेनंतर अपेक्षेप्रमाणे सेना-भाजपने दंगलखोरांना दिलेल्या नरम वागणुकीचा निषेध केला आणि दंगलखोर मुस्लिम असल्यानेच हा असा मुलायम व्यवहार घडल्याचा आरडाओरडा सुरू केला आहे. खरं तर हा आरोप त्यांनी करावा ही नवलाचीच बाब म्हणायला हवी. हिंसक आंदोलनं करणं हा या दोन्ही पक्षांचा आणि आता राज ठाकरेंच्या मनसेचा आवडता उद्योग आहे. आणि जेव्हा जेव्हा त्यांनी अशी आंदोलने केली तेव्हा पोलीसांनी कधीही गोळीबार केलेला नाही, ही ही खरी गोष्ट आहे. सेना-मनसेसाठी कायद्याचा काच नसतो, मग सत्तेवर कुणीही असो.

पटनाईकांची संवेदनशीलता आणि नीती ही एक गोष्ट झाली. पण ते नेतृत्व करत असलेल्या पोलीस दलाची तोकडी माहिति-यंत्रणा ही वेगळी बाब आहे. आझाद मैदानवरील सभेसाठीचा प्रचार जवळपास एक आठवडा आधीपासून सुरू होता. शहरातील सर्व मुस्लिमबहुल भागांमध्ये सभेची इंग्रजी, हिंदी आणि ऊर्दू पोस्टर्स लागलेली होती. मियान्मार आणि आसाममधील मुस्लिमांवरील अत्याचाराच्या खऱ्या-खोट्या चित्रफिती वेगाने फिरवल्या जात होत्या. ऊर्दू प्रसारमाध्यमांमध्ये या साऱ्याचे वर्णन भरभरून येत होते. मुस्लिमांवर होणाऱ्या अत्याचारांकडे दुर्लक्ष केले जात आहे असे आवाज इंग्रजी प्रसारमाध्यमांमध्येही उमटताना दिसत होते. त्यातच अमेरिकेतील गुरुद्धारामधील गोळीबारामध्ये झालेल्या शीखांच्या हत्याकांडाबद्दल आख्ख्या देशात निर्माण झालेल्या रोषाच्या प्रतिक्रियेने आपल्याबद्दल कुणालाच काही वाटत नाही अशी भावना मुस्लिमांमध्ये पक्की झाली.

पोलिसांनी हे सारे पाहिले नव्हते का? मुंबई पोलीसांमध्ये मुस्लिमांच्या भरतीबद्दल असलेली अनास्था, ऊर्दू भाषेबद्दलचं मुस्लिमविरोधी दृष्टिकोण, आणि कुठलाही अज्ञान, एकूणातच मुस्लिमविरोधी दृष्टिकोण, आणि कुठलाही दहशतवादी प्रकार घडला की ताबडतोबीनं मुस्लिम तरुणांना ताब्यात घेणं सुरू होणं या साऱ्यातून मुस्लिमांमध्ये नेमकं काय चालू आहे हे मुंबई पोलीसांना कळतच नाही. असं सगळं असूनही एका अतिरिक्त पोलीस आयुक्तानं (विशेष शाखा) या सभेसाठी वातावरण तापवलं जातं आहे आणि सभेच्या वेळी पोलिसांच्या मोठ्या संख्येची गरज लागेल असा गोपनीय अहवाल पोलीस आयुक्तांना पाठवला असल्याचं वृत्त बाहेर आलं आहे. तर पोलीस आयुक्तांनी आपल्या कृतीचं समर्थन करताना सभेच्या वेळी जॉइंट कमिशनर जातीने उपस्थित होते, तसेच ६५० पोलीस तैनात केले होते पण जमावाचा हिंसाचार अनपेक्षित असल्याचं सांगितलं.

रझा अकादमीचा आजवरचा इतिहास पाहता त्यांचं असं म्हणणं पटू शकत नाही. आसाममधील हिंसाचारासारख्या प्रचंड संवेदनशील मुद्द्यावर सभा आयोजित करण्याची परवानगी रझा अकादमी सारख्या बेजबाबदार संस्थेला दिलीच कशी असा प्रश्न आज मुस्लिमांमधील अनेकजण विचारत आहेत. खुद्द नसीम खान या काँग्रेसी मंत्र्याचाच वरदहस्त रझा अकादमीवर असल्यानंच ही परवानगी मिळाली ही सूर्यप्रकाशाइतकी सत्य गोष्ट आहे. या सभेचे दुसरे आयोजक म्हणजे मौलाना मोईनुद्दिन मिया हे होत. त्यांचे छगन भुजबळ आणि आर.आर.पाटील या दोघांशी नजिकचे संबंध असल्याचे मानले जाते. एकूणात राजकीय छत्रछाया असलेल्या या दोन्ही गटांना सभा आयोजित करण्यासाठी परवानगी नाकारणे ही गोष्ट मुळातच सोपी नव्हती. त्यात सभेला परवानगी नाकारली असती तर लोकांच्या लोकशाही हक्कांचा भंग होतो अशी ओरड आयोजकांनी आणि ऊर्दू प्रसारमाध्यमांनी केली असती. त्यात भर म्हणून धर्मनिरपेक्षवाद्यांनी मग तुम्ही हिंदुत्ववाद्यांना-सेना-मनसेला आगखाऊ सभा घेण्याच्या, बंद पुकारण्याच्या आणि त्यांची मनगटशाही दाखवण्याच्या संध्या कशा देता असा प्रश्न विचारून त्यांना साथ दिली असती. ही गोष्ट खरीही आहे म्हणा, उदाहरणार्थ आज मुंबईतील टोलनाक्यांवर मनसेच्या कार्यकर्त्यांकडून टोल वसूल केला जात नाही कारण तो केला तर जो प्रतिसाद मिळतो तो अधिक महागडा ठरतो.

रझा अकादमीने सभा बोलावल्याबद्दल आणि त्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेल्यामुळे मुस्लिमांमध्ये नाराजी पसरलेली असली तरी आज त्यांच्यापैकी कुणी जाहीरपणे ती व्यक्त करताना दिसत नाही, भीतीची भावना आहे. केवळ काही मुस्लिम कार्यकर्त्यांनी, ज्यांना समाजात फारसं गांभीर्यानं घेतलं जात नाही, अशांनी जाहीरपणे टीका केली आहे. एका ऊर्दू वर्तमानपत्रानं रझा अकादमीचे नाव घेणं टाळत सभेच्या आयोजकांना गजाआड करण्याची मागणी केली आहे. फरीद बटाटावाला नावाच्या एका समाज कार्यकर्त्याने मात्र मोठ्या

धाडसाने रझा अकादमीच्या सभेत आगखाऊ भाषणे झाल्याच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार नोंदवली आहे.

मुस्लिम तरुणांची मानसिकता

या सर्व प्रकरणाचा एक आयाम कुठेच नोंदवला गेलेला दिसत नाही. तो आयाम म्हणजे, सभेहून परतताना काही तरुणांचा मुस्लिमेतरांप्रतीचा अत्यंत आक्षेपार्ह व्यवहार (अर्थात हा व्यवहार सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये सामान्य मुस्लिमांसाठी आम असलेला आपण अनुभवलेला आहे). सभेमध्ये मियान्मार आणि बौद्धांच्या विरोधी फलक झळकत होते.

याचा अर्थ असा की आज मुंबईतील मुस्लिमांमध्ये शिवसेना, बजरंग दलाच्या तरुण कार्यकर्त्यांसारखा एक कार्यकर्ता वर्ग तयार झालेला आहे. हे काही नेहमीचे अशिक्षित गरीब मुस्लिम नाहीत तर फेसबुक आणि यु ट्यूबचा वापर करणारे आणि तोही अत्याधुनिक मोबाईल्सद्वारे करणारे हे तरुण आहेत. त्यांच्या नेत्यांना राजकीय पाठबळ असले तरी या तरुणांचं आणि अंतिमत: मुंबई शहराचं रक्षण ११ ऑगस्टला कुणी केलं असेल तर ते अरुप पटनाईकांनी केलं आहे हे गोष्ट निर्विवाद आहे. आता या मुलांचं रक्षण करण्याची जबाबदारी शहरातल्या बहुसंख्य मूक मुस्लिम ज्येष्ठांची, विशेषत: तरुणांच्या पालकांची आहे. अर्थातच ही जबाबदारी पेलणं सोपी गोष्ट असत नाही. शांतताप्रिय पण मूक असलेल्या हिंदूंची बहुसंख्या सेनेच्या आक्रमक कारवायांना कधीच समोरासमोर तोंड देऊ शकली नाही पण मतपेटीद्वारे मात्र त्यांनी सेनेला तिची जागा दाखवून दिली होती.

झाल्या प्रकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे मुंबईतील हिंदूंच्या मनात मुस्लिमांबद्दल विद्वेषाची भावना अधिक मजबूत होते आहे. हे लोक कायमच उपद्रव निर्माण करत असतात, असं ऐकायला येतं आहे. खरं तर असं उपद्रवकारी वर्तन मुंबईत वेगवेगळे सैनिक सातत्यानं करतच असतात. पण त्यांची मनगटशाही ही आम मुंबईकरांनी गृहितच धरलेली दिसते, असं का?

●

(ज्योती पुनवणी यांचा मूळ लेख २५ ऑगस्ट २०१२ च्या इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली या साप्ताहिकात प्रसिद्ध झाला होता. त्याचा भावानुवाद अभय कांता यांनी केला आहे.)

वाटसरूंचे प्रतिनिधी

- **अकोला** : डॉ. संतोष कायंदे, भ्र. ९४२१७४८७८२
- **अहमदनगर** : प्रा. विजय ठाणगे, भ्र. ९८२२६७१८४५
- **औरंगाबाद** : डॉ. भारत गोरे, भ्र. ९४२२४७८०००
- **नंदूरबार** : दिलीप सोलंकी, भ्र. ९८८१८२४५०५
- **लातूर** : डॉ. उमाकांत जाधव, भ्र. ९४०५७५९८८८
- **धुळे/जळगाव** : प्रा. संदीप नेरकर, अमळनेर, भ्र. ९४२३४९४७८०
- **यवतमाळ/नागपूर** : प्रा. संदीप तुंडुलवार, नागपूर, भ्र. ९८९०२७५७९३
- **नांदेड** : प्रा. राजेंद्र इंगळे, भ्र. ९४२३३०५८२७
- **बीड** : प्रा. राजेश गायकवाड, भ्र. ९४२००३००५०
- **नाशिक** : प्रा. प्रशांत देशपांडे, भ्र. ९४२२७६०६०४
- **चिपळूण** : प्रा. विराज महाजन, भ्र. ९४२११४०७६७
- **सोलापूर** : हसीब नदाफ, भ्र. ९३२६२६४०८८
- **सातारा** : प्राचार्य सीताराम गोसावी, भ्र. ९८५०१५६१६६
- **बारामती** : डॉ. सीमा नाईक-गोसावी, भ्र. ९८५०९३४३४२
- **रायगड** : प्रा. व्यंकट खटके, भ्र. ९४२१२५३७१०
- **परभणी** : प्रा. पी. बी. मेणे, भ्र. ९४२१३९२१३०.

29. हबीबा

हबीबा मुज़्ज़फरनगर (उत्तर प्रदेश) के एक गांव में गूजर ख़ानदान में सन् 1833 में पैदा हुई थीं। घरेलू तालीम हासिल करने के बाद आप उर्दू अख़बारात से अंग्रेज़ों के ज़ुल्म के ख़िलाफ जानकारी हासिल करके जद्दोजहदे-आज़ादी में हिस्सा लेना चाहती थीं। लेकिन जवान लड़की को घर के लोग इजाज़त नहीं दे रहे थे। इसी बीच सन् 1857 की जंग अपने शबाब पर थी और हबीबा के गांव से अंग्रेज़ी फौज का बराबर गुज़रना होता था। एक दिन उस जांबाज लड़की ने देखा कि मुजाहिदे-आज़ादी के कुछ नौजवान अंग्रेज़ी फ़ौज से बचने के लिए गांव में पनाह लेने की गरज़ से रुके हैं। अंग्रेज़ी फ़ौज जब उन मुजाहिदों को गिरफ्तार करने के लिए गांव में दाख़िल होने लगी तो हबीबा ने अपने साथ दो सहेलियों को लेकर पेड़ के टुकडों को रास्ते में डालकर आग लगा दी, जिसकी वजह से अंग्रेज़ी घुड़सवार आगे नहीं जा सके और इसी दौरान बाग़ी नौजवान दूसरे रास्ते से निकल गये। बाद में *अंग्रेजी फ़ौज ने हबीबा को फ़ौज की मज़ाहमत के जुर्म में गिरफ्तार करके जेल भेज दिया, जहां सन् 1857 के दिसम्बर माह की किसी तारीख को उन्हें फांसी की सज़ा दे दी गयी।*

30. निशातुन्निसा बेगम (बेगम हसरत मोहानी)

बेगम हसरत मोहानी की कहानी भी उन बहुत-सी भूली-बिसरी दास्तानों में शुमार की जा सकती है, जिनके साथ आज़ाद हिन्दुस्तान की तवारीख़ ने मुनासिब इंसाफ नहीं किया। बेगम हसरत का शुमार उन औरतों में किया जाता है, जिन्होंने बीसवीं सदी में क़ौमी तहरीके़-आज़ादी में बढ़-चढ़कर हिस्सा लिया। आप उन औरतों में से थीं, जिन्होंने अपनी पूरी ज़िन्दगी मुल्क की ख़िदमात में लगा दी।

चकबस्त ने उनकी क़ौमी ख़िदमात को सराहते हुए सुबहे-उम्मीद में क़ौम के नौजवानों को मश्वरा दिया था कि *बेगम हसरत की हैसियत आम जलसों में सियासी मर्दानगी का राग गाने के लिए ही नहीं, बल्कि कु़र्बानी का सबक़ हासिल करने के लिए भी है।* निशातुन्निसा (बेगम हसरत मोहानी) की पैदाइश सन् 1885 में मोहान जिला उन्नाव के एक इज़्जतदार घराने में हुई थी। आपके वालिद सैय्यद शबीब हसन मोहानी रियासते-हैदराबाद के हाईकोर्ट में वकील थे। निशातुन्निसा बेगम उस ज़माने के लिहाज से पढ़ाई-लिखाई से महरूम नहीं थीं और उन्हें मज़हबी तालीम के साथ-साथ उर्दू, अरबी, फ़ारसी ज़बानों की माक़ूल तालीम दी गयी थी।

सन् 1901 में जब आप हसरत मोहानी की ज़िंदगी में दाख़िल हुईं तब आप सियासी ज़िन्दगी से अंजान न थीं। देहाती माहौल की पली इस लड़की का हौसला हर तरह से हसरत मोहानी के लिए माक़ूल था। माली एतबार से कम होने के बावजूद उनको कभी किसी क़िस्म की शिकायत नहीं थी। हर क़दम पर आप मौलाना साहब के साथ खड़ी रहती थीं, इसलिए हसरत मोहानी को उन पर फ़ख्र था। इस तरह जंगे-आजादी में उनकी कुर्बानी और उनकी सियासी मालूमात हसरत मोहानी की ज़िंदगी में बड़ी अहम थी।

जब हसरत मोहानी कैद किये गये तो उस वक़्त बेगम हसरत जंगे-आजादी में कूद पड़ीं और उन्होंने यह साबित कर दिया कि शौहर के चन्द सालों का साथ और देहाती माहौल में पली बढ़ी हुई लड़की की मालूमात कितनी बेदार और पुख़्ता थी! इस तरह आप अपनी मंज़िल की तरफ़ आगे बढ़ रही थीं।

13 अप्रैल सन् 1916 को हसरत मोहानी को दूसरी बार गिरफ़्तार किया गया, मगर यह गिरफ़्तारी बेगम हसरत के लिए मील का पत्थर साबित हुई और उन्होंने घर की चहारदीवारी से निकलकर हसरत के मुक़दमे की पैरवी अपने ज़िम्मे ली और इस काम को बड़ी हिम्मत व दिलेरी से अंजाम दिया। मुक़दमे की पैरवी के दौरान एक अंग्रेज़ अफ़सर ने डराने की कोशिश की तो आप उससे डरने के बजाय लड़ गयीं और कहा कि *तुम मुझे गिरफ्तार कर सकते हो लेकिन रोक नहीं सकते।*

हसरत मोहानी अभी क़ैद में ही थे कि बेगम हसरत ने वज़ीरे-हिन्द से मुलाक़ात करने वाले हिन्दुस्तानी ख़्वातीन के एक डेलीगेशन में शिरकत की। इस शिरकत की अहमियत इस वजह से भी बढ़ जाती है कि निशातुन्निसा बेगम ने मुलाक़ात के वक़्त जिस हिम्मत और बहादुरी से अपनी बात रखी, वह अकेला ही आपके किरदार की बुलन्दी के लिए काफ़ी था।

सन् 1919 वह ज़माना था जब हिन्दुस्तान की सियासी जिंदगी एक नयी करवट ले रही थी। बेगम हसरत के किरदार और क़ौमी महाज़ पर उनकी सरगर्मियों की वजह से बी. अम्मा जैसी आज़ादी की अज़ीम मुजाहिद की नज़र में उनके लिए कितनी इज़्जत थी इसका पता श्रीमती उमा नेहरू के नाम लिखे उनके ख़त से चलता हैं, जिसमें 13 दिसम्बर सन् 1917 उन्होंने लिखा था कि अख़बारों से मुझे मालूम हुआ है कि आपके और उस बहादुर और प्यारी बेटी निशातुन्निसा बेगम के साथ मुझे भी ख़्वातीन के उस डेलिगेशन की क़यादत करनी है, जो तमाम ख़्वातीने-हिन्द की तरफ से जनाब वज़ीरे-हिन्द से मिलने के वास्ते इस महीने की 18 तारीख़ को मद्रास में तय हुआ है।

इस तमाम तफ़सील का मतलब यह है कि क़ौमी जंगे-आज़ादी में बेगम हसरत मोहानी की कुर्बानियों, उनकी हिम्मत बहादुरी और मुल्क के लिए मोहब्बत को

भुलाया नही जा सकता। उनकी कुव्वते-इरादी की फ़ौलाद जैसी हिम्मत हर चट्टान से टकराने के लिए काफ़ी थी।

31. मुनीरा बेग़म

मुनीरा बेगम बिहार के मुमताज़ शायर और रहनुमा मज़हरुल हक की बीवी थीं। वह *इण्डियन नेशनल कांग्रेस* के सदर बदरूद्दीन तैय्यबजी की भतीजी थीं। आपका निकाह सन् 1917 में मौलवी मज़हरुल हक़ साहब से हुआ था। आपका ताल्लुक़ पटना के एक बड़े ज़मींदार घराने से था। आपने लन्दन से बार-एट-लॉ किया और वहीं गांधीजी, अली इमाम और सच्चिदानन्द सिन्हा के क़रीब आयीं। आपने पटना से बाहर बगहा के महाज़ पर *सत्य आश्रम* की बुनियाद डाली और इसके बाद आपने विदेशी लिबास और अपने सभी ऐशो-आराम को छोड़कर फ़क़ीराना ज़िंदगी गुज़ारी।

अकबर हैदरी के नाम गांधीजी के एक ख़त से अंदाज़ा होता है कि मुनीरा बेग़म ने क़ौम व वतन की ख़ातिर इस बड़ी क़ुर्बानी में अपने शौहर का पूरा साथ दिया। ख़त इस तरह लिखा गया था—

प्यारे दोस्त, हम अभी बांकीपुर पीछे छोड़कर आये हैं। मज़हरुल हक हमारे साथ हैं। मैं आपके संज्ञान में लाना चाहता हूं कि पिछली रात मेरे द्वारा बुलायी गयी स्त्री मीटिंग में बेगम मज़हरुल हक़ ने अपने चार जोड़ी हीरे के कंगन हमें दिये हैं। क्या आप बेगम हैदरी को एक ऐसी स्त्री की बहन होने पर बधाई पेश करेंगे जो मुल्क व क़ौम की ख़ातिर इतनी बड़ी कुर्बानी दे सके? जब उन्होंने मुझे कंगन पेश किये तो मेरा दिल खुशी से भर आया और मैंने भगवान का शुक्रिया अदा किया, जिसने मुझे तैय्यबजी के परिवार के पास आने का मौक़ा दिया।

32. आबदी बानो बेगम (बी अम्मा)

आपकी पैदाइश सन् 1852 में अमरोहा (मुरादाबाद) में हुई थी। आपकी शादी रामपुर स्टेट के अब्दुल अली ख़ान साहब से हुई थी। आपके शौहर का इंतक़ाल जवानी में ही हो गया था। आपके दो बेटे बेटे थे; मोहम्मद अली, शौकत अली। दोनो ही छोटे थे। ये वही दो बच्चे थे जो आगे चलकर *अली ब्रदर्स* के नाम से हिन्दुस्तान की जंगे-आज़ादी

भुलाया नही जा सकता। उनकी कुव्वते-इरादी की फ़ौलाद जैसी हिम्मत हर चट्टान से टकराने के लिए काफ़ी थी।

31. मुनीरा बेग़म

मुनीरा बेगम बिहार के मुमताज़ शायर और रहनुमा मज़हरुल हक की बीवी थीं। वह *इण्डियन नेशनल कांग्रेस* के सदर बदरूद्दीन तैय्यबजी की भतीजी थीं। आपका निकाह सन् 1917 में मौलवी मज़हरुल हक़ साहब से हुआ था। आपका ताल्लुक़ पटना के एक बड़े ज़मींदार घराने से था। आपने लन्दन से बार-एट-लॉ किया और वहीं गांधीजी, अली इमाम और सच्चिदानन्द सिन्हा के क़रीब आयीं। आपने पटना से बाहर बगहा के महाज़ पर *सत्य आश्रम* की बुनियाद डाली और इसके बाद आपने विदेशी लिबास और अपने सभी ऐशो-आराम को छोड़कर फ़क़ीराना ज़िंदगी गुज़ारी।

अकबर हैदरी के नाम गांधीजी के एक ख़त से अंदाज़ा होता है कि मुनीरा बेग़म ने क़ौम व वतन की ख़ातिर इस बड़ी क़ुर्बानी में अपने शौहर का पूरा साथ दिया। ख़त इस तरह लिखा गया था—

प्यारे दोस्त, हम अभी बांकीपुर पीछे छोड़कर आये हैं। मज़हरुल हक हमारे साथ हैं। मैं आपके संज्ञान में लाना चाहता हूं कि पिछली रात मेरे द्वारा बुलायी गयी स्त्री मीटिंग में बेगम मज़हरुल हक़ ने अपने चार जोड़ी हीरे के कंगन हमें दिये हैं। क्या आप बेगम हैदरी को एक ऐसी स्त्री की बहन होने पर बधाई पेश करेंगे जो मुल्क व क़ौम की ख़ातिर इतनी बड़ी कुर्बानी दे सके? जब उन्होंने मुझे कंगन पेश किये तो मेरा दिल खुशी से भर आया और मैंने भगवान का शुक्रिया अदा किया, जिसने मुझे तैय्यबजी के परिवार के पास आने का मौक़ा दिया।

32. आबदी बानो बेगम (बी अम्मा)

आपकी पैदाइश सन् 1852 में अमरोहा (मुरादाबाद) में हुई थी। आपकी शादी रामपुर स्टेट के अब्दुल अली ख़ान साहब से हुई थी। आपके शौहर का इंतक़ाल जवानी में ही हो गया था। आपके दो बेटे बेटे थे; मोहम्मद अली, शौकत अली। दोनो ही छोटे थे। ये वही दो बच्चे थे जो आगे चलकर *अली ब्रदर्स* के नाम से हिन्दुस्तान की जंगे-आज़ादी